# प्रेस नोट

## राजगुरूनगर भागात चुलत्याचा खून करुन फरारी झालेल्या आरोपीतांना खंडणी विरोधी पथकाकडून अटक

दि. १२/११/२०१६ रोजी सायंकाळी ०७-०० वा. चे सुमारास गुळाणीचा घाट राजगुरूनगर, खेड जि. पुणे येथे इसम नामे जिजाभाऊ पांडुरंग वरुडे रा. वडगाव पाटोळे ता. खेड जि. पुणे याचा नात्याने पुतन्या असलेल्या प्रमोद चंद्रकांत वरुडे वय २० रा. सदर याने आपले साथीदाराच्या मदतीने खून केल्याबाबत खेड पोलीस स्टेशन येथे दि. १२/११/२०१६ रोजी गुन्हा दाखल झाल्याने सदर गुन्ह्यातील आरोपी प्रमोद चंद्रकांत वरुडे हा मोशी टोल नाका येथे आला असल्याबाबतची माहिती खंडणी विरोधी पथकाचे पोलीस नाईक सचिन अहिवळे यांना मिळाल्याने त्याबाबत खंडणी विरोधी पथकाचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांचे सुचनांप्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार व खंडणी विरोधी पथकाच्या स्टाफने सापळा रचुन मोशी टोल नाका येथे आरोपी नामे प्रमोद चंद्रकांत वरुडे व गुन्ह्यात मदत करणारा त्याचा सहकारी दर्शन गजानन गभाडे वय १९ रा. राजगुरूनगर ता. खेड जि. पुणे यांना पकडून गुन्हा उघडकीस आणला असून पुढील कार्यवाहीकरीता खेड पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आले आहे.

**वरील कारवाई ही प्रभारी अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री दिपक साकोरे पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे श्री. पी.आर.पाटील व सहा. पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री.सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कदम, सहा पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार, पोलीस स्टाफ सचिन अहिवळे, प्रशांत पवार, निलेश देसाई, मंगेश पवार यांनी केलेली आहे.**